वित्त विभाग (खुद्द) विमा प्रशासन कार्यासनामधील सादरीकरणाचे स्तर निश्चित करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
कार्यालयीन आदेश क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१४/विमा प्रशासन,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ३२.
दिनांक : ११ मे, २०१८

कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ९(२) अनुसार प्रत्येक कार्यालयाचा किंवा विभागाचा प्रमुख त्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित सर्व बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने त्या सादर करण्यासाठी शक्यतो अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करील अशी तरतूद आहे. अशा प्रकारे निर्धारित केलेले अधिकाऱ्यांचे स्तर प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिल रोजी अद्यावत करण्याची तरतूद कलम ९(३) मध्ये आहे.

२. उपरोक्त अधिनियमातील कलम ९(२) ला अनुसरुन विमा प्रशासन कार्यासनातील प्रकरणे सादर करण्याचे स्तर जोडपत्र-अ नुसार प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांनी निश्चित केले आहेत. त्यानुसार विमा प्रशासन कार्यासनातील कामकाजाचा निपटारा करण्यात यावा. तथापि, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निर्देश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास प्रकरणपरत्वे त्यामध्ये योग्य तो बदल करण्यात येईल.

३. सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०५१११६३५००५६०५ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shubhangi Rajan Sheth

Digitally signed by Shubhangi Rajan Sheth
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed6787d4f25b2cc00214a10047a10d4fa848c8d19fb8dda27b4525e3ace2c767, cn=Shubhangi Rajan Sheth
Date: 2018.05.11 16:36:22 +05'30'

(शुभांगी शेठ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. अपर मुख्य सचिव (वित्त) / अपर मुख्य सचिव (वि.सु.) / प्रधान सचिव (ले.व को.) / प्रधान सचिव (वि.सु.) , वित्त विभाग.
२. सर्व सह / उप सचिव, वित्त विभाग.
३. प्रभारी संचालक, विमा संचालनालय, म्हाडा भवन, वांद्रे पूर्व, मुंबई ५१.
४. अवर सचिव (प्रशासन-२), वित्त विभाग.
५. निवड नस्ती (विमा प्रशासन)

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१४/विमा प्रशासन, दिनांक ११ मे, २०१८ सोबतचे विवरणपत्र

जोडपत्र - अ

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ९(१) व (२) अंतर्गत कार्यासनाशी संबंधित अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करणे

अ.क्र.	विषय	स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी	आदेश / प्रमाणपत्र निर्गमित करण्यास सक्षम अधिकारी
		प्रथम	द्वितीय	तृतीय		
१	विमा संचालनालयाच्या आस्थापनाविषयक बाबी					
१.१	सर्व संवर्गातील पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करणे	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	मा.मंत्री (वित्त)	प्रभारी सचिव
१.२	महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशनाने गट-अ व गट-ब राजपत्रित पदांकरिता शिफारस झालेल्या उमेदवारांची नियुक्ती	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	मा.मंत्री (वित्त)	सह / उप सचिव
१.३	गट-अ व गट-ब च्या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यासाठी निवडसूची तयार करणे.	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	मा.मंत्री (वित्त)	सह / उप सचिव
१.४	गट-अ व गट-ब च्या पदावरील अधिकाऱ्यांची ज्येष्ठतासूचीबाबतची प्रकरणे	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	प्रभारी सचिव	कक्ष अधिकारी
१.५	गट-अ व गट-ब च्या पदावरील अधिकाऱ्यांची विभागीय चौकशीबाबतची प्रकरणे	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	मा.राज्यमंत्री / मा.मंत्री (वित्त)	सह / उप सचिव
१.६	महापार संगणक प्रणालीवर विमा संचालयानातील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहून घेण्याबाबत समन्वयन	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	--	--	सह / उप सचिव

अ.क्र.	विषय	स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी	आदेश / प्रमाणपत्र निर्गमित करण्यास सक्षम अधिकारी
		प्रथम	द्वितीय	तृतीय		
१.७	राजपत्रित अधिकाऱ्यांची गोपनीय / कार्यमूल्यांकन अहवालातील प्रतिकूल शेऱ्यांबाबतची प्रकरणे / पदोन्नतीच्या पात्रतेपर्यंत न पोहोचणाऱ्या गोपनीय अहवालांवरील कार्यवाहीबाबतची प्रकरणे.	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	मा.मंत्री (वित्त)	सह / उप सचिव
१.८	गट-अ च्या अधिकाऱ्यांना स्थायित्व लाभ देण्याबाबतची प्रकरणे	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	मा.मंत्री (वित्त)	सह / उप सचिव
१.९	पदोन्नतीबाबत मानीव दिनांक देण्याबाबतची प्रकरणे	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	मा.मंत्री (वित्त)	सह / उप सचिव
१.१०	अवैध जाती प्रमाणपत्रासंदर्भातील प्रकरणे	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	प्रभारी सचिव	सह / उप सचिव
१.११	राजपत्रित अधिकाऱ्यांची स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबतची प्रकरणे	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	प्रभारी सचिव	कक्ष अधिकारी
१.१२	वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रकरणे (प्रशासकीय विभागाची मान्यता आवश्यक असलेल्या प्रकरणी)	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	प्रभारी सचिव	कक्ष अधिकारी
१.१३	गट-अ व गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या प्रकरणी सेवेची ३० वर्षे किंवा वयाची ५०/५५ वर्षे पूर्ण होताना करावयाचे पुनर्विलोकन	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	मा.राज्यमंत्री / मा.मंत्री (वित्त)	सह / उप सचिव
१.१४	विमा संचालनालयासाठी नवीन पदे निर्माण करणे, पुढे चालू ठेवणे तसेच पदांचा आढावा व आकृतिबंध मंजूर करुन घेणे	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	प्रभारी सचिव	सह / उप सचिव
१.१५	विमा संचालनालयाकडून अभिप्रायार्थ येणाऱ्या सेवाविषयक बाबींसंदर्भात सेवा कार्यासनांचे अभिप्राय प्राप्त करुन घेणे.	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	--	सह / उप सचिव	कक्ष अधिकारी

अ.क्र.	विषय	स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी	आदेश / प्रमाणपत्र निर्गमित करण्यास सक्षम अधिकारी
		प्रथम	द्वितीय	तृतीय		
१.१६	अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण खर्चास मान्यता	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	--	सह / उप सचिव	कक्ष अधिकारी
२	माहितीचा अधिकार अधिनियमाखालील अर्ज	कक्ष अधिकारी	--	--	कक्ष अधिकारी	कक्ष अधिकारी
३	माहितीचा अधिकार अधिनियमाखालील अपील	सह / उप सचिव	--	--	सह / उप सचिव	सह / उप सचिव
४	विमा संचालनालयाच्या अर्थसंकल्पविषयक बाबी, पुरवणी मागण्या	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	प्रभारी सचिव	कक्ष अधिकारी
५	विमा संचालनालयाच्या लेखापरीक्षण विषयक बाबी, लोकलेखा समितीच्या शिफारशी	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	प्रभारी सचिव	कक्ष अधिकारी
६	विमा संचालनालयाकडून उतरविण्यात आलेल्या विम्याप्रकरणी रु.५० कोटीपेक्षा जास्त रकमेच्या विमा दाव्यांना मान्यता देणे	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	मा.मंत्री (वित्त)	सह / उप सचिव
७	विमा संचालनालयाच्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये सरकारी वकिलांची नेमणूक करणे इ. बाबी	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	प्रभारी सचिव	सह / उप सचिव
८	गट विमा योजनेच्या संबंधातील धोरणात्मक बाबी	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	मा.मंत्री (वित्त)	सह / उप सचिव
९	गट विमा योजनेसंबंधात तक्रारी किंवा अभिप्रायासाठी मंत्रालयीन विभागांकडून येणारे अनौपचारिक संदर्भ	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	--	सह / उप सचिव	कक्ष अधिकारी
१०	राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी समूह अपघात विमा योजनेच्या संबंधातील धोरणात्मक बाबी	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	प्रभारी सचिव	मा.मंत्री (वित्त)	सह / उप सचिव
११	राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी समूह अपघात विमा योजनेसंबंधात तक्रारी किंवा अभिप्रायासाठी मंत्रालयीन विभागांकडून येणारे अनौपचारिक संदर्भ	कक्ष अधिकारी	सह / उप सचिव	--	सह / उप सचिव	कक्ष अधिकारी